महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : सीएमए-४०२३/सीआर-१६०/२०२३/जाहिरात** **दिनांक :- २४ जुलै, २०२४**

## -: शुद्धिपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२४,**
**(जाहिरात क्रमांक ४१४/२०२३, दिनांक २९ डिसेंबर, २०२३)**
**संदर्भ :- आयोगाची दिनांक ०८ मे, २०२४, ३० मे, २०२४ व १२ जुलै, २०२४ रोजीची शुद्धिपत्रके**

**महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४, जाहिरात क्रमांक ४१४/२०२३** करीता अराखीव (खुला) अथवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना आयोगाच्या दिनांक ०८ मे, २०२४ च्या शुद्धिपत्रकानुसार सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाचा तसेच दिनांक ३० मे, २०२४ रोजीच्या शुद्धिपत्रकानुसार इतर मागास वर्गाचा विकल्प सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे.

**२.** महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ मधील नियम क्रमांक ५(२) अनुसार ज्या व्यक्ती, उन्नत व प्रगत गटात मोडत नसतील अशा सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गातील व्यक्तींनाच केवळ या अधिनियमातील आरक्षण उपलब्ध असेल अशी तरतूद आहे. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता दिनांक ०८ मे, २०२४ व ३० मे, २०२४ रोजीच्या शुद्धिपत्रकास अनुसरून सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाचा(SEBC) अथवा इतर मागास वर्गाचा (OBC) चा विकल्प/दावा सादर केलेल्या परंतु उन्नत व प्रगत गटात मोडत असल्याचा/नसल्याचा दावा (Creamy Layer/Non-Creamy Layer) न केलेल्या उमेदवारांनी सदर दाव्याची नोंद, आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES अंतर्गत 'NCL Claim for SEBC/OBC' येथील बाह्यलिंकद्वारे **दिनांक २९ जुलै, २०२४ रोजी १४.०० वा. ते १४ ऑगस्ट, २०२४ रोजी २३.५९ वा. पर्यंत** नोंदविणे आवश्यक आहे.

**३.** सदर दाव्याच्या पृष्ठ्यर्थ संबंधित उमेदवारांनी सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (Non-Creamy Layer) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**४.** दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध जाहिरात तसेच दिनांक २४ जानेवारी, २०२४, ०८ मे, २०२४, ३० मे २०२४ व १२ जुलै २०२४ रोजी प्रसिद्ध शुद्धिपत्रकामधील इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही.

उपसचिव (जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण :- नवी मुंबई